# पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर
## प्रेस नोट दि.०९/०५/२०१८
## दि.०८/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते २४/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे

**भाग-१ ते ५ चे गुन्हे**

१

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे १८९/१८,भादविक ३२४,३२३,४५२,४२७,५०४,क्रीमी.लॉ.अमेंडमेंट ॲक्ट ३ व ७ |
| **फिर्यादी** | संदिल देवेंद्र,वय-३२ वर्षे,रा.१३४/४,शिवदर्शेन,पुणे |
| **आरोपी** | १.करण शडय्या देवेंद्र,वय-१९ २.अर्जुन सडया देवेंद्र,वय-२० ३.कृष्णा कृष्ण देवेंद्र,वय-१९ ४.मकरंद अनिल जाधव,वय-२० ५.सौरभ विकास कांबळे,वय-२०,सर्व रा. १३४/४,शिवदर्शेन मंदिरा जवळ,पुणे (अटक) व इतर |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०७/०५/२०१८ रोजी २१/०० वा.शिवदर्शनचे पहिल्या कमानी जवळ असणा-या आय.ट्रॅप दुकाना जवळील सार्वजनिक रोडवर व साक्षीदर मिलींद बेंद्रे यांचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हे सुरभी मंगल कार्यालयाचे मांडवा मध्ये मॅट टाकण्यासाठी त्याचे मित्र गणेश देवेंद्र याचे मोटार सायकलवरुन अरण्येश्वर रोडने जात असताना,नमुद ठिकाणी यातील नमुद इसमांनी फिर्यादी यांची गाडी थांबवुन,फिर्यादीस लाथा-बुक्यांनी मारहाण केली. तसेच बांबुने डोक्याच्या डाव्या बाजुला कानावर मानेवर व डाव्या हाताच्या कोप-या जवळ मारुन जखमी केले आहे. त्यावेळी मिलींद बेंद्रे व त्याची पत्नी हे भांडणे सोडवण्यासाठी आले असता त्यांनादेखील लाथा-बुक्यांनी मारहाण करीत असताना,मिलींद यांचे पत्नीचे गळयातील सोन्याचे गंठण पडुन गहाळ झाले आहे. सदर ठिकाणी होणा-या मारहाणी मुळे दहशतीचे वातावरण तयार झाल्याने लोक सैरावैरा धावुन,आजुबाजूचे लोकांनी दरवाजे बंद केले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.हवा. नावडकर ९८८१९६४५६७ |

२

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | दत्तवाडी पो स्टे १८८/१८,भादविक ४०६,४१९,४२०,४६८ |
| **फिर्यादी** | सौ.माणिक नांगरे,वय-४३,रा.सदाशिव पेठ,पुणे |
| **आरोपी** | एक इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | सन २०१२ चे कालावधीत बॅक ऑफ महाराष्ट्र शाखा टिळक रोड,२०३४,सदाशिव पेठ,पुणे व फिर्यादीचे राहते घरी |
| **तपशिल** | यातील नमुद इसमाने फिर्यादी यांना चांदिच्या व्यवसायाचे योजनेत महिना १० टक्के किंवा वर्षात दामदुप्पट रक्कम करुन देतो असे अमिष दाखवुन,सन २०१२ चे कालावधीत वेळोवेळी फिर्यादी यांचेकडुन एकुण ३९,००,०००/- रुपये घेवुन,त्याबद्दल्यात सदरची रक्कम किंवा त्याचा ठरलेला मोबदला फिर्यादी यांना परत न देता,त्या पैशाचा वापर स्वतःचे फायदया करीता अपहार करुन फसवणुक केली आहे. |
| **त.अंमलदार** | म.पो.उप.निरी. नरके ९६६५९३५३४३ |

३

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | एमआयडीसी पो स्टे १४८/१८,भादविक ३०६,३४ |
| **फिर्यादी** | उमेश रामदास सातव,वय-४०,रा.चाकण,पुणे |
| **आरोपी** | एकुण चार इसम (अटक नाही) |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.२५/०७/२०१७ रोजी ते दि.०६/०५/२०१८ रोजीपर्यंत ग्लास फायबर इंडस्ट्रिज कंपनी मोशी, पुणे येथे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी यांचे वडील रामदास सहादु सातव,वय-७२ वर्षे,रा.ग्लास फायबर इंडस्ट्रिज कंपनी मोशी,पुणे यांचा मोठा मुलगा सुजित रामदास सातव यास नारायण गव्हाण येथे जमीन खरेदी करावयाची असल्याने त्याने त्याचे वडील रामदास सातव यांना सांगुन,सोपान व धनंजय सस्ते यांचेकडुन दोन टक्के व्याजाने एकुण २५ लाख रूपये कर्ज घेतले होते. |

परंतु सुजित याने घेतलेल्या कर्जाची परतफेड न करता त्याचे वडील रामदास यांना कर्ज फेडण्यास भाग पाडण्यासाठी त्यांना वेळोवेळी शिवीगाळ व मारहाण केली. तसेच सोपान व धनंजय सस्ते यांनी रामदास यांनी घेतलेल्या कर्जाची केली असल्याचे लिहुन घेतले असताना देखील सुजित याने त्याचे वडील रामदास यांना वारंवार त्रास देवुन देवुन,नमुद इसमांनी फिर्यादीचे कंपनीत येवुन त्यांचे वडीलांना पैसे का देत नाही असे म्हणुन त्यांना धमकावुन फिर्यादी यांना लाथा-बुक्क्यांनी मारहाण करून जीवे मारण्याची धमकी देवुन,सदर इसमांनी रामदास सातव यांना कंपनीतील ऑफीस मध्ये गळफास घेवुन आत्महत्या करण्यास प्रवृत्त केले.

**त.अंमलदार** पो.उप.निरी. एच.बी.कोकणी ८८०५९१४१००

**<u>दि.०९/०५/२०१८ रोजी रात्रौ ००/०० वा.ते दु.१२/०० वा.पर्यंतचे दाखल गुन्हे</u>**

**१**

| | |
|---|---|
| **पो.स्टे.गुरनं./कलम** | वारजे पो स्टे १५६/१८,भादविक ३९२,३४ |
| **फिर्यादी** | एक महिला,वय-२०,रा.पिरंगुट,ता.मुळशी,जि.पुणे |
| **आरोपी** | मोटार सायकलवरील दोन अनोळखी इसम |
| **गु.घ.ता.वेळ व ठिकाण** | दि.०८/०५/२०१८ रोजी १९/३० वा.मुंबई-पुणे बेंगलोर हायवे रोड वरून खाली सर्व्हीस रोडला वेदभवनकडे जाणारे फाटयाकडे वारजे,पुणे |
| **तपशिल** | यातील फिर्यादी हया त्यांचे वडील व भाऊ यांचेसह मोटार सायकलवरून जात असताना, यातील इसमांनी त्यांचे मोटार सायकलवरून पाठीमागुन डाव्या बाजुने येवुन, पाठीमागे बसलेल्या इसमाने फिर्यादी यांचे गळ्यातील १,००,०००/- किचे सोन्याचे मंगळसुत्र जबरदस्तीने हिसका मारून जबरी चोरी करून,सर्व्हीस रोडने चांदणी चौकाचे दिशेने मोटार सायकलवरून पळुन गेले आहे. |
| **त.अंमलदार** | पो.उप.निरी. एस.एन.धावडे ९९२२२६१४६९ |

**जनसंपर्क अधिकारी,**
**पोलीस आयुक्त कार्यालय,पुणे शहर**